मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करावयाच्या
कालव्यावरील बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्र
संदर्भातील तरतुदीतील सुधारणा.

महाराष्ट्र शासन
पाटबंधारे विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक ३१ जुलै १९९७
क्रमांक . सीडीओ १०९५/२०१९/(४९/९५)/मो.प्र. (प्र.)
सुधारणा -

पहावे - शासन परिपत्रक क्र. सीडीए- १०९५/२०१९/(४९/९५)/मोप्र (प्र)
दिनांक १० जून १९९७.

वर नमुद केलेल्या शासन परिपत्रकातील आदेश क्र. १ (अ) ज्या बांधकामाची किमत रु. ५० लक्ष ते १०० लक्ष इतक्या मर्यादित आहे, परंतु कालव्याचा विसर्ग ३५ घ.मी./सेकंदपेक्षा जास्त आहे, अशा कालव्यावरील विसर्ग बांधकामाचे (स्ट्रक्चरचे) संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करण्यात यावीत. असे नमूद केले आहे त्याऐवजी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत असून त्या अनुषंगाने उपरोक्त संबंधित आदेशावरील भाग क्र. १ (अ) आता खालीलप्रमाणे वाचावा.

१.० (अ) ज्या बांधकामाची किंमत रु. ५० लक्ष ते २५० लक्ष इतक्या मर्यादेत आहे परंतू कालव्याचा विसर्ग ३५ घ.मी. /सेकंद पेक्षा जास्त आहे अशा कालव्यावरील बांधकामाचे (स्ट्रक्चरचे) संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करण्यात यावीत.

सही/-
(भ.तु. रेडकर)
शासनाचे उपसचिव

प्रत -
पाटबंधारे विभागातील सर्व मुख्य अभियंता
पाटबंधारे विभागातील सर्व अधीक्षक अभियंता
पाटबंधारे विभागातील सर्व तांत्रिक कार्यासने/सर्व उप अभियंता
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेचे सर्व अधीक्षक अभियंता (५ जादा प्रतींसह)
मो.प्र. (प्र.) संग्रहार्थ

२. अधीक्षक अभियंता यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त शुध्दीपत्रक त्यांनी त्यांच्या खालील कार्यकारी अभियंता यांचे निदर्शनास आणावे.